# मिरा भाईंदर महानगरपालिका

कार्यालयः- डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन, नगरभवन, मांडली तलाव, तळ मजला, भाईंदर (प.),
ता. जि. ठाणे-४०११०१, दुरध्वनी क्र. ०२२-२८१९२८२८/२८९३०२८
ई-मेल:moh@mbmc.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

## सार्वजनिक आरोग्य विभाग

जा.क्र.मनपा/सार्व.आ.वि./9845/२०२६-२७ दिनांक : 21/ 10 /२०२७.

प्रति,

१. जनसंपर्क अधिकारी
२. सिस्टम मॅनेजर
मिरा भाईंदर महानगरपालिका.

**विषय :- महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर व वृत्तपत्रात जाहिरात प्रसिध्द करणेबाबत.**

उपरोक्त विषयान्वये मिरा भाईंदर महानगरपालिका भारतरत्न इंदिरा गांधी रुग्णालय, मिरा रोड येथील मॅमोग्राफी मशीन हाताळण्याकामी **मॅमोग्राफी तंत्रज्ञ** या पदाची मानद तत्वावर निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात पद भरणेकामी मा. आयुक्त यांची मंजुरी प्राप्त झालेली आहे.

तरी महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर व वृत्तपत्रात जाहिरात प्रसिध्द करण्यात यावी.

सोबत जाहिरातीचा मसुदा जोडलेला आहे.

(डॉ.नंदकिशोर लहाने)
**वैद्यकीय आरोग्य अधिकारी**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका

कार्यालय:- डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन, नगरभवन, मांडली तलाव, तळ मजला, भाईंदर (प.),
ता. जि. ठाणे-४०११०१, दुरध्वनी क्र. ०२२-२८१९२८२८/२८९३०२८
ई-मेल:moh@mbmc.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

## सार्वजनिक आरोग्य विभाग

जा.क्र.मनपा/सार्व.आ.वि./९४५५ /२०२६-२७ दिनांक:-२८/१० /२०२६.

## // जाहिरात //

**विषय : मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या भारतरत्न इंदिरा गांधी रुग्णालय येथे मॅमोग्राफी तंत्रज्ञ या पदावर मानद तत्वावर निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात आवश्यकतेनुसार नेमणूक करणेबाबत.**

मिरा भाईंदर महानगरपालिका भारतरत्न इंदिरा गांधी रुग्णालय, मिरा रोड येथील मॅमोग्राफी मशीन हाताळण्याकामी मानद तत्वावर निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात नेमणूक करणेकामी **मॅमोग्राफी तंत्रज्ञ** या पदाची जाहिरात प्रसिध्द करुन इच्छुक व पात्र उमेदवारांची निवड करणेकामी अर्ज करण्यासाठी कळविण्यात येत आहेत.

खालील नमुद केलेली शैक्षणिक अर्हता व पात्रता धारण करणाऱ्या तसेच इतर अटींची पूर्तता करणाऱ्या उमेदवारांनी, विहित नमुन्यातील अर्ज व आवश्यक त्या गुणपत्रके व प्रमाणपत्रांच्या स्व-साक्षांकित प्रतींसह दि.**१७/११**/२०२६ रोजी सायं. ५.०० वाजेपर्यंत ऑफलाईन पध्दतीने सार्वजनिक आरोगय विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन, नगरभवन, मांडली तलाव, तळ मजला, भाईंदर (प.), ता. जि. ठाणे-४०११०१ येथे अर्ज सादर करावा. पात्र उमेदवारांची प्रारुप गुणवत्ता यादी तयार करण्यात येईल. सदर यादीमधील उमेदवारांची, आवश्यकतेनुसार व विहित अटी-शर्तींच्या अधीन राहून, गुणानुक्रमानुसार मानद तत्त्वावर निव्वळ तात्पुरत्या स्वरूपात नेमणूक करण्यात येईल.

| अ.क्र. | पदनाम | शैक्षणिक पात्रता | मानद तत्वावरील मासिक मानधन | एकूण पदांची संख्या |
|---|---|---|---|---|
| १. | मॅमोग्राफी तंत्रज्ञ | १) मान्यताप्राप्त विद्यापीठाची विज्ञान शाखेची पदवी (रेडिओलॉजी विषयासह).<br>२) शासनमान्य रुग्णालयातील मेमोग्राफी टेक्निशियन पदावर ३ वर्षाचा अनुभव.<br>३) मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक. | रु. २५,०००/- | १ |

उपरोक्त पदांकरीताच्या अटी-शर्ती व अर्जाचा नमुना याकरीता मिरा भाईंदर महानगरपालिकेचे संकेतस्थळ https://mbmc.gov.in यांवर भेट द्यावी.

**मा. आयुक्त यांच्या मान्यतेने.**

**(कविता बोरकर)**
उप-आयुक्त (सार्व. आरोग्य)
मिरा भाईंदर महानगरपालिका

**अटी व शर्ती :-**

१. सदर जाहिरातीच्या अनुषंगाने प्राप्त अर्जांच्या छाननीअंती प्रारूप गुणवत्ता यादी (Draft List) तयार करण्यात येईल. या यादीमधून, महानगरपालिकेच्या आवश्यकतेनुसार आणि गरजेनुसार, मानद तत्त्वावर निव्वळ तात्पुरत्या स्वरूपात प्रथमतः सहा महिन्यांकरिता नियुक्ती आदेश देण्यात येतील.

२. सदर जाहिरातील पदसंख्या अथवा इतर बाबींमध्ये बदल करणे अथवा जाहिरातीनुसार होणाऱ्या भरती प्रक्रियेत कोणत्याही प्रकारचा बदल करणे अथवा जाहिरातीनुसार होणारी भरती प्रक्रिया कोणत्याही टप्प्यावर कोणतेही कारण न देता रद्द करणे याबाबतचे सर्व अधिकार मा. आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका यांना असतील.

३. वयोमर्यादा ६० वर्षांपर्यंत.

४. वरील पदे ही संपुर्णपणे मानद तत्वावर कंत्राटी स्वरुपाचे असल्याने या पदावर कायम स्वरुपाची नियुक्ती मागण्याचा हक्क असणार नाही. तसेच निवड झालेल्या उमेदवारास मिरा भाईंदर महानगरपालिका सेवेत सामावून घेण्याबाबत किंवा भविष्यात कायम स्वरुपी नोकरी मागण्याचा हक्क राहणार नाही. तसेच आपणांस कोणत्याही न्यायालयात याबाबत दावा दाखल करता येणार नाही. तसेच सदर नेमणुकीमुळे कायम कर्मचाऱ्यांच्या सवलती किंवा पदावर कायम करण्यासाठी मागणी करण्याचा अधिकार आपणांस असणार नाही.

५. विहित पात्रता धारण न करणाऱ्या उमेदवारांचे अर्ज, पुर्ण किंवा चुकीचे भरलेले अर्ज, वय, शैक्षणिक अर्हता, गुणपत्रक, अनुभव इत्यादी संदर्भातील आवश्यक त्या प्रमाणपत्राच्या स्व-साक्षांकित सत्यप्रती (True copy) जोडलेले नसलेले अर्ज अप्राप्त समजण्यात येऊन बाद करण्यात येतील.

६. प्रारुप गुणवत्ता यादी (Draft List) मधून नियुक्ती करण्यात येणाऱ्या उमेदवारांना नियुक्ती आदेश दिल्यानंतर ०३ दिवसांच्या आत रुजू होणे आवश्यक राहील.

७. निवड झालेल्या उमेदवारांनी पात्रता व अनुभवाच्या मुळ कागदपत्रांसह एक पासपोर्ट आकाराचा फोटो व आवश्यक मुळ कागदपत्रांच्या छायांकित सत्यप्रतीचा एक संच घेऊन नियुक्तीसाठी हजर राहणे आवश्यक आहे.

८. वरील पदासाठी कामाचे स्वरुप ठरविण्याचे अधिकार वैद्यकीय आरोग्य अधिकारी / विभाग प्रमुख यांना राहतील.

९. सदर पदाकरीता दररोज किमान आठ तास (रुग्णालयाच्या सोईनुसार) सेवा देणे बंधनकारक असेल. पदांची कामकाजाची वेळ निश्चित करण्याचे अधिकार विभाग प्रमुख यांचे असतील. तथापि, अत्यावश्यक सेवा असल्याने आवश्यकतेप्रमाणे जादाचे कामकाज करावे लागेल व त्याचे अतिरिक्त मानधन अदा करण्यात येणार नाही. मासिक मानधन हे Bio-metric attendance नुसार अदा करण्यात येईल.

१०. अपात्र ठरलेल्या उमेदवारांच्या बाबतीत कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही.

११. सदरची नियुक्ती ही मानद तत्वावर (मासिक मानधनावर) तात्पुरत्या स्वरुपाची असेल. महानगरपालिकेस आवश्यता नसल्यास सदरची नियुक्ती कोणत्याही पूर्वसूचना किंवा त्यासाठी १ महिन्याची नोटीस दिली जाणार नाही याची स्पष्ट नोंद घ्यावी.

१२. पात्र उमेदवारास नियुक्ती देणेबाबतचे सर्व अधिकार मा. आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका यांनी स्वतःकडे राखुन ठेवले आहेत. याबाबत कोणालाही कोणत्याही प्रकारचा दावा सांगता येणार नाही.

१३. उमेदवाराला नियुक्तीनंतर राजीनामा द्यावयाचा असल्यास किमान १५ दिवसांची लेखी नोटीस द्यावी लागेल अन्यथा त्या महिन्याचे मानधन अदा केले जाणार नाही.

१४. संशयास्पद सचोटी, गैरवर्तवणुक/अशोभनीय वर्तन, वरीष्ठाची दिशाभुल करणे, गैरहजर राहणे, आदेशाचे पालन न करणे याबाबत कोणतीही पुर्वसूचना न देता सेवा संपुष्टात आणली जाईल.

१५. वेळोवेळी लागू करण्यात येणाऱ्या इतर अटी/शर्ती संबधितांना लागू राहतील. तसेच उमेदवाराचे काम समाधानकारक नसल्यास कोणत्याही टप्प्यावर उमेदवारांची सेवा समाप्त करण्याचे अधिकार मा. आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका यांना राहतील.

१६. निवडीच्या कोणत्याही टप्प्यावर अर्जदार अर्हता धारण न करणारा आढळल्यास, गैरवर्तन व दबावतंत्राचा वापर करताना आढळल्यास त्याची उमेदवारी आपोआप रद्दबातल होईल. तसेच नियुक्ती झाली असल्यास कोणतीही पुर्वसूचना न देता त्याची नियुक्ती समाप्त करण्यात येईल.

१७. विहित मुदतीत विहित नमुन्यात (मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या वेबसाईटवर उपलब्ध असलेल्या अर्जाचा नमुना) अर्ज प्राप्त न झाल्यास असे अर्ज ग्राह्य धरण्यात येणार नाहीत यांची स्पष्ट नोंद घ्यावी.

**मा. आयुक्त यांच्या मान्यतेने.**

**(कविता बोरकर)**
**उपायुक्त (सार्व.आरोग्य)**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**जाहिरात क्र. जा.क्र.मनपा/सार्व.आ.वि./ /२०२६-२७ दिनांक:-**

## अर्जाचा नमुना

**(अर्ज भरण्या अगोदर संपूर्ण जाहिरात वाचा)**

**विभाग** : **सार्वजनिक आरोग्य विभाग**

पदाचे नांव (जाहिरातीत नमूदनुसार) : मॅमोग्राफी तंत्रज्ञ

प्रति,
मा.उपायुक्त (सार्व. आरोग्य),
मिरा भाईंदर महानगरपालिका

| उमेदवाराचे छायाचित्र (पासपोर्ट साईज) व खालील चौकोनात स्वाक्षरी |
|---|
| |

(१) उमेदवाराचे संपूर्ण नांव : मराठी | इंग्रजी (कॅपिटल लेटर)

१. **आडनाव** : .................................................. ..................................................

२. **स्वत:चे नाव** : .................................................. ..................................................

३. **वडिलांचे/ पतीचे नाव** : .................................................. ..................................................

(२) **पत्रव्यवहाराचा संपूर्ण पत्ता (पिन कोडसहित)** : **(कायमस्वरुपी)** | **(सध्याचा)**

.................................................. ..................................................

.................................................. ..................................................

.................................................. ..................................................

**जिल्हा** .................................................. ..................................................

**राज्य** .................................................. ..................................................

**पिन कोड** .................................................. ..................................................

**संपर्कासाठी दूरध्वनी / भ्रमणध्वनी क्रमांक** ............................ /........................................./.........................................

**ई-मेल आयडी**

(३) **अ) जन्मतारीख** :

| तारीख | महिना | वर्ष |
|---|---|---|
| | | |

(४) ब) जाहिरात प्रसिध्द झालेल्या दिनांक रोजीचे वय ..........................वर्ष..........................महिने............दिवस

(५) लिंग :

(६) राष्ट्रीयत्व : भारतीय / अभारतीय

(७) अर्जदार महाराष्ट्राचा मूळ रहिवासी आहे काय ? : होय/नाही

(८) वैवहिक स्थिती (होय/नाही) :

(९) अवगत असणाऱ्या भाषा (योग्य ठिकाणी (✓) अशी खूण करावी.)

| मराठी | हिंदी | इंग्रजी | अन्य |
|---|---|---|---|
| | | | |

(१०) शैक्षणिक अर्हता: (दहावी पासून चढत्या क्रमाने माहिती भरावी) (ग्रेड किंवा SGPA/CGPA नमूद करू नका, फक्त टक्केवारी नमूद करावी.)

| अ.क्र. | उत्तीर्ण केलेली परीक्षा | मंडळ/विद्यापीठाचे नाव | परीक्षा प्राप्त गुण | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

(११) अतिरिक्त शैक्षणिक अर्हता :

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

(१२)

| | |
|---|---|
| संगणक अर्हता : (MSCIT किंवा मान्यता प्राप्त समकक्ष कोर्स) | |

(१३) अनुभव :

| संस्थेचे नाव, पत्ता व ज्या पदावर काम केले आहे ते पदनाम | शासकीय/ निमशासकीय/ खाजगी | कालावधी | | एकुण (वर्ष/महिना/दिवस) | सेवा सोडण्याचे कारण |
|---|---|---|---|---|---|
| | | पासुन | पर्यंत | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

| | | | |
|---|---|---|---|
| १४) | आपणाविध्द न्यायप्रविष्ट प्रकरण, फौजदारी, शिस्तभंगाविषयक प्रकरण वा तत्सम इत्यादी कारवाई चालू आहे काय ? | होय | नाही |

(१५) अर्जासोबत खालील (छायांकित) सत्यप्रती जोडलेल्या आहेत.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १) | ........................ | २) | ...................................... | ३) | ...................................... |
| ४) | ........................ | ५) | ...................................... | ६) | ...................................... |
| ७) | ........................ | ८) | ...................................... | ९) | ...................................... |

मी असे प्रमाणित करतो/करते की, वर नमुद केलेली माहिती खरी असुन, ती खोटी आढळल्यास माझी उमेदवारी नियुक्तीच्या कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल आणि माझे विरुध्द कायदेशीर कारवाई होईल याची मला जाणीव आहे.

ठिकाण :-

दिनांक :- अर्जदाराची सही/-

## फौजदारी गुन्हा दाखल नसले बाबतचे

## हमीपत्र

मी. श्री/श्रीम./कुमारी ........................................................................... वय............ वर्ष. सध्या ..............................
राहणार असे लिहुन देतो/देते की, या पत्यावर ..... वर्षापासुन आजपर्यंत राहत आहे.

तरी मी वास्तव्य करीत असलेल्या वरील नमूद कालावधीत माझे विरुध्द मी राहत असलेल्या कार्यक्षेत्रातील पोलीस स्टेशनच्या आभिलेखावर काही एक दखलपात्र गुन्हा अथवा आक्षेपार्ह नोंदी नाही.

ठिकाण :-
दिनांक :-

अर्जदाराची सही